# प्रेस नोट

कोरोनाच्या पार्श्वभुमीवर सुरु असलेल्या लॉकडाऊन काळात जिल्हयातील कुठलाही नागरिक उपाशी राहता कामा नये यासाठी अन्न नागरी पुरवठा विभागाकडुन विविध उपाययोजना केल्या आहेत. दि. १ ते ५ एप्रिल २०२० या पाच दिवसात उस्मानाबाद जिल्यातील एकुण शिधा पत्रिकापैकी ११२१७८, शिधापत्रिका धारकांना तब्बल ३०३८०.०४ क्विं. अन्नधान्याचे वाटप करण्याचा उच्चांक गाठला आहे. जिल्हयातील माहे एपिल २०२० करिता एपीएल शेतकरी योजनेचे गहु ६८५ मे. टन व तांदुळ ४५८.९० मे.टन इतके धान्याचे नियतन मंजुर असून त्याचे वाटप लाभार्थ्यांना याच महिन्यात करण्यात येणार असल्याची माहिती उस्मानाबाद जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीम. डॉ. चारुशीला देशमुख यांनी दिली आहे. तसेच टंचाई भासवून चढया दराने कोणीही विक्री केल्यास दुकानदारावर कारवाई करण्यात येईल.

जिल्हयात राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत अंत्योदय व प्राधान्य कुटुंब लाभार्थी असे दोन्ही रेशनकार्डमधील पात्र लाभार्थ्यांची संख्या सुमारे ११४६६३१ आहेत. या लाभार्थ्यांना स्वस्त धान्य दुकानांव्दारे सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा लाभ दिला जातो. बीपीएल कार्ड असलेल्या लाभार्थ्यांना अंत्योदय योजनेंतर्गत २ रुपये किलो दराने प्रति कार्ड २३ किलो गहु आणि ३ रु. किलो दराने प्रती कार्ड १२ किलो तांदुळ दिला जातो. त्याचप्रमाणे २० रु. किलो दराने एक किलो साखर दिली जाते.

तर केशरी रेशनकार्ड असलेल्या प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांना २ रु. किलो दराने प्रती व्यक्ती ३ किलो गहु व ३ रु. किलो दराने प्रती व्यक्ती २ किलो तांदुळ दिला जातो.

तसेच केशरी रेशनकार्ड असलेल्या एपिएल शेतकरी लाभार्थ्यांना २ रु. किलो दराने प्रती व्यक्ती ३ किलो गहु व ३ रु. किलो दराने प्रती व्यक्ती २ किलो तांदुळ दिला जातो.

उस्मानाबाद जिलहयात या योजनेमधून दि. ०१.०४.२०२० ते ०५.०४.२०२० यां कालावधीत सुमारे ३०३८०.४० क्विं. गहु व तांदुळ वाटप करण्यात आले आहे.

प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेंतर्गत एप्रिल ते जून पर्यंत प्रती लाभार्थी प्रती महिना ५ किलो तांदुळ मोफत देण्याची योजना आहे. पात्र रेशनकार्ड धारकाने नियमित स्वस्त धान्य खरेदी केल्यानंतर त्या कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला ५ किलो अतिरिक्त तांदुळ मोफत देण्याची सुचना केंद्र शासनाने व्हिडीओ कॉन्फरन्स व्दारे दिलेली आहे. त्यामुळे आता प्रत्येक पात्र रेशन कार्ड धारकाला नियमित धान्य घेतल्यानंतर प्रती व्यक्ती ५ किलो तांदुळ कुटुंबातील व्यक्तींच्या संख्येनुसार मोफत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सदर योजनेतील अंत्योदय योजनेकरिता ८७७.१० मे.टन व प्राधान्य कुटुंब लाभ योजनेकरीता ४७६६.१० मे. टन तांदळाचे नियतन भारतीय खादय निगम कडून प्राप्त करुन घेवून पैकी ६१८.०७ मे.टन इतके नियतन आज दि. ०६.०४.२०२० अखेर जिल्हयातील शासकीय धान्य गोदामापर्यंत पोहोच झाले असून त्याची लाभांर्थ्यांना वाटपाची सुरुवात जिल्हयात तुळजापूर तालुक्यातील पी..के. सावंत व कळंब तालुक्यातील श्री नरहिरे, सुवर्णयुग महिला बचत गट, वाशी तालुक्यातील दुकान क्रं. १,३,८ तसेच उमरगा तालुक्यातील दुकान क्र.५, ९,११,१२ अशा एकुण १० रास्तभाव दुकानामधून आज दि. ०६.०४.२०२० पासून वाटपास सुरुवात करण्यात आली आहे व उर्वरीत रास्तभाव दुकानामध्ये सदरचे धान्य पोहोच करून या आठवडयात पात्र लाभार्थ्यांना मोफत वाटप करण्यात येणार आहे. हे मोफत धान्य माहे एप्रिल सोबतच मे आणि जून मध्ये सुध्दा त्या त्या महिन्यात उपलब्ध करुन दिले जाणार आहे.

## जास्त दराने वस्तुंची विक्री केल्यास होणार कारवाई

जिल्हयात जीवनावश्यक वस्तुंची आणि औषधांची कोणतीही टंचाई नाही. किराणा दुकानांमधून वस्तुंचा पुरवठा सुरळीत व्हावा याकरिता शासन यंत्रणा खबरदारी घेत आहे. मात्र सध्या लॉकडाउनच्या पार्श्वभुमीवर काळाबाजार व अतिरिक्त भाव वाढीच्या अनेक ठिकाणाहून तक्रारी प्राप्त होत आहेत. जीवनावश्यक वस्तुंची साठेबाजी किंवा चढया दराने विक्री केल्यास सात वर्षापर्यंत कैद होवू शकते. याबाबत पुरवठा विभाग, वैध मापन शास्त्र विभाग व पोलीस यांना संयुक्त कारवाई करण्याचे निर्देश मा. जिल्हाधिकारी दीपा मुधोळ- मुंडे यांनी दिले आहे. अशी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी उस्मानाबाद श्रीम. डॉ. चारुशीला देशमुख यांनी दिली आहे.

Deshmukh
6/4/20

जिल्हा पुरवठा अधिकारी उस्मानाबाद

प्रतिः-

जिल्हा माहिती अधिकारी उस्मानाबाद यांना देवून कळविण्यात ये ते की, सदर योजनेच्या धान्य वाटपाबाबतची व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

Scanned by CamScanner